(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – II ISSN 2277-8063

# भारताचे पुर्व आशियाई धोरण

**प्रा.डॉ.रविंद्र भणगे** प्राध्यापक व विभाग प्रमुख राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण त्या देशांच्या शेजारील राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणावर आधारित असते. त्याचा परिणाम व प्रभाव हा आपल्या देशातील परराष्ट्र धोरणावर होत असतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत हेच धोरण अवलबंले गेले. भारताचे आशियाई धोरण हे भारत केंद्रित आहे. भारत हा आशिया खंडातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश आहे. भारताच्या दृष्टीने पूर्वेकडील काही राष्ट्रांशी जवळीक महत्वपूर्ण आहे. भारताच्या वेगवेगळया राष्ट्रासोबत असणाऱ्या संबंधामध्ये त्या राष्ट्रांप्रती असणारी प्राथमिकता वेगळी आहे. चीन व पाकिस्तान हे भारताचे मुख्य शेजारी राष्ट्रे आहेत. हे दोन्ही देश भारताच्या सुरक्षेच्या संदर्भात वारंवार आव्हान निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. दोन्ही देश अण्विक क्षमतेने संपन्न आहेत. चीन भारतापेक्षा संरक्षणाच्या बाबतीत सरस आहे. दोन्ही देश सतत भारताचे गुप्त व खुल्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या प्रतिमेला इजा पोहोचवू शकतात. भारताचा या दोन्ही देशासोबत युध्दांचा कटू अनुभव आहे. मात्र भारताच्या पूर्वेकडे असलेल्या छोटया देशांच्या संदर्भात असे नाही. दोन्ही देश क्षेत्रिय राजकारण व सैन्य कराराद्वारे भारताच्या विभिन्न क्षेत्रामध्ये असणाऱ्या शक्ती संतुलनामध्ये परिवर्तन करण्याचे सामर्थ्य ठेवतात.

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात आमुलाग्र परिवर्तन झाले. या परिवर्तनाने भारताच्या देशार्तगत स्तरावर जेथे उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण या धोरणाचा अवलंब केला. त्याचवेळी बाहय संबंधाच्या संदर्भात पूर्वेकडे पहा या धोरणाची निर्मिती झाली. हे धोरण १९९० च्या सुरूवातीच्या काळामध्ये समोर आले आणि क्षेत्रीय संघटना आशियानद्वारे दक्षिण—पूर्व आशियाला अधिक महत्व देण्याचा प्रयत्न केला. सुरवातीच्या काळात हे धोरण ऊर्जा व आर्थिक आवश्यकतेच्या संदर्भात घटकांद्वारे संचलित होत होते. त्यानंतरच्या काळामध्ये व्यूव्हरचनात्मक, संरक्षणात्मक बाजूचा देखील यामध्ये समावेश केला. भारताने पूर्वेकडे पहा या धोरणाव्दारे आपल्या आर्थिक विकासात्मक कार्यक्रमांना प्राथमिकता देऊन स्व:ताची बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील वर्तमान बदलामुळे त्यांच्या मार्गातील आव्हाने तितकीच गंभीर स्वरूपाची बनली आहेत. शेजारील देशांशी चांगले संबंध निर्माण करण्यासंदर्भात अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे. भारताच्या पूर्व आशियाई देशांच्या संबंधाबाबतीत भारताच्या संपूर्ण वाटचालीमध्ये दोन शेजारी देश चीन व पाकिस्तान गंभीर प्रतिस्पर्धाच्या रूपामध्ये कार्य करीत आहेत. सार्क, आशियान, एसमीओ, आईओआर, ए.आर.सी इत्यादी संघटनासोबत भारत जोडला गेलेला आहे. यावरून स्पष्ट होते की भारताला आपल्या शेजाऱ्यांमध्ये अधिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्यापासूनच भारताचे शेजारी देशांशी असलेले धोरण हे एका चौकटीत बांधलेले असे नाही. भू—रणनिती स्तरावर व भू—राजकीय स्वरूपात क्षेत्रिय विविधतेच्या कारणांमुळे केंद्रीय व परिघीय अशा दोन्ही शेजाऱ्यांशी वेगवेगळया पध्दतीने सामना करावा लागत आहे. शेजारी देशाशी संबंध वाढवण्यासाठी भारत द्विपक्षीय व बहुपक्षीय सिध्दांताला लागू करीत आहे. हे संबंध जागतिक स्तरावर प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नरसिंहराव यांचे 'लुक ईस्ट' धोरण—पूर्वेकडील मोर्चेबांधणीस अधिक महत्व देणारे ठरले. गेल्या काही दशकात भारताने आशियाई राष्ट्रांशी आपले संबंध दृढ करण्यास सुरूवात केली व 'लुक ईस्ट' धोरणाचे २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या कारकीर्दीत 'ॲक्ट ईस्ट' धोरणात रूपांतर झाले. आशियाई महासत्ता व तिसऱ्या जगाची नेतृत्व करणारी क्षमता असणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाऊ लागले. आशियाई प्रदेशात काही विधायक मोर्चेबांधणी करण्याच्या दृष्टीने अलिकडच्या काळात भारत सरकारने महत्वपूर्ण पावले उचलण्यास सुरूवात केली आहे.

**भारताचे पूर्वकडे पहा हे धोरण**

परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये त्या त्या देशांच्या शेजारील राष्ट्रांमध्ये घडणाऱ्या महत्वपूर्ण घटनांचा परिणाम व प्रभाव असतो. पूर्व इतिहास, भू—राजकीय संघटना, सामाजिक, आर्थिक स्थिती, जातीय मुद्दे, सुरक्षेचे स्वरूप, राजकीय स्थिरता इत्यादी घटक शेजारी राष्ट्रांना मोठया प्रमाणात प्रभावित करतात. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत याच गोष्टी लागू होतात. भारताची भौगोलिक वास्तविकता लक्षात घेता भारताला शेजारील देशांशी सौदाहर्यपूर्ण संबंध असणे गरजेचे होते व आहे. भारतास चीन व पाकिस्तान या देशांच्या सीमारेषा लागून आहे. याचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर सरळ परिणाम होता. हे दोन्ही देश भारताच्या सुरक्षेला वारंवार आव्हान देत असतात. हे दोन देश सोडले तर भारताचे इतर शेजारील देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मात्र १९९१ ते १९९६ पूर्वी भारताने शेजारील राष्ट्रांकडे दुर्लक्ष करून अमेरिकेशी संबंध वाढवण्यावर भर दिला. मात्र याच काळात चीनने भारताच्या शेजारी व पूर्वेकडील देशांशी संबंध वाढवून या देशांवर आपला प्रभाव वाढवण्यास सुरूवात केली. आणि या देशांशी भारताचे संबंध कमी—कमी होत गेले याची जाणीव भारताला होऊ लागली. त्यामुळे पूर्वेकडील देशांशी संबंध वाढवण्याचा पहिला प्रयत्न पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांना १९९२ साली भारताने पूर्वेकडे पहा हे धोरण राबविण्यास सुरूवात केली. भारताने दक्षिण—पूर्व

आशियाई देशांचे महत्व ओळखून त्यांच्याशी संबंध सुधारण्यावर भर दिला. या देशांशी आर्थिक, व्यापारी संबंध सुधारण्यावर भर दिला. तसेच भारताने आपल्या पूर्वकडील देशांच्या आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष देण्यास सुरूवात केली. नरसिंहराव यांच्या काळात १९९२ मध्ये भारत आसियानचा डायलॉग पार्टनर बनला. भारताचे पूर्वेकडील देशांशी संबंध दृढ होण्यास सार्क व आसियान या दोन संघटना महत्वाच्या आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांची विभागीय सहकार्य संघटना (सार्क) यामध्ये भारत—पाकिस्तान, नेपाळ, भूटान, अफगाणिस्तान, बांग्लादेश, मालदीव, श्रीलंका इत्यांदींचा समावेश आहे. आशियाई सदस्य राष्ट्रामध्ये जनतेचे कल्याण आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास, परस्पर विश्वास सुरक्षा या उद्दिष्टांने प्रेरित होऊन ही संघटना स्थापन केली. तर आसियान—आग्नेय आशियाई राष्ट्रांची संघटना, क्षेत्रिय सहकार्यावर आधारित असून आग्नेय आशियातील इंडानेशिया, मलेशिया, फिलीपाइन्स, सिंगापूर, कंबोडिया, लाओस, थायलंड, ब्रुनेई, म्यानमार, व्हिएतनाम या देशांचा समावेश आहे. कारण आसियान हा जगातील एक मोठा व्यापार संघ आहे. भारताचे पंतप्रधान एच. डी. दैवेगौडा यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री असलेले डॉ. इंद्रकुमार गुजराल यांनी १९९६—९७ या काळात गुजराल सिंध्दांत मांडून त्यांनी भारताच्या शेजारील राष्ट्रांशी संबंध दृढ करण्यावर भर दिला.[१]

**गुजराल सिध्दांत**

डॉ. इंद्रकुमार गुजराल यांनी गुजराल सिंध्दांत मांडला त्यामुळे त्यांनी पुढील गोष्टींचा समावेश केला आहे. या देशांनी आपापले वाद, समस्या, एकमेकांशी द्विपक्षीय चर्चा करुन सोडविले पाहिजेत, बांग्लादेश, भूटान, नेपाळ, मालदीव, श्रीलंका या शेजारी देशांना आपल्याबद्दल श्रध्दा व विश्वास वाटेल. अशा पध्दतीचे वातावरण निर्माण करणे, कोणताही देश एकमेंकांच्या अंतर्गत प्रश्नांना हस्तक्षेप करणार नाही, दक्षिण आशियाई देशांना एकमेकांच्या भौगोलिक एकात्मकता व सार्वभौमत्वाचा आदर करावा, दक्षिण आशियातील राष्ट्राने आपल्या भूमीचा इतर कोणत्याही देशाला परस्पर कुरघोडया करण्याच्या प्रयत्नासाठी वापर करु द्यायचा नाही इ. गोष्टी त्यांनी या सिध्दांतात मांडल्या आहेत. गुजराल सिध्दांताचे सार म्हणजे दक्षिण आशियातील एक मोठा देश म्हणून भारताने स्व:ताहून इतर छोटया देशाना काही सवलती द्याव्यात जेणेकरुन त्यांचा भारतावर विश्वास वाढेल. शेजाऱ्यासोबतच्या संबधामध्ये जवळीक साधण्याच्या उद्देशाने भारताला सकारात्मक परिवर्तनाची निर्मिती करावयची होती. भारताच्या शेजारील राष्ट्रांच्या मदतीवर व योजनांवर लक्ष्य केंद्रीत केलेल्या सर्व राष्ट्रांनी भारताला सहमती दर्शवली. भारत १९९५ मध्ये असियान क्षेत्रीय फोरम (ए.आर.एफ) चा सदस्य बनून १९९६ मध्ये 'आसियानचा फुल डॉयलॉग पार्टनर' बनला.

भारताच्या 'पूर्वकडे पहा' या धोरणाच्या दुसऱ्या टप्यात भारत, दक्षिण पूर्व आशिया, असियान सोबत व्यापारी आणि संस्थागत संबंधामध्ये पुढे गेला. त्यामध्ये चीन, ऑस्ट्रेलिया, न्यझीलंड, जावा, तैवान, हॉगकॉग, जपान, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, ईस्ट तिमोर, पियोजियांग, मंगोलिया, कॅनडा या उर्वरित देशांचा समावेशही होतो. १९९८ मध्ये आण्विक चाचणीनंतर भारताला जागतिक स्तरावर एक शक्तीच्या स्वरुपात बघितले गेले. भारत वर्तमानामध्ये सांस्कृतिक व व्युहात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक व ऊर्जा, सैनिकी सहकार्याच्या माध्यमातून आपल्या शक्तीला वाढवू पाहत आहे. म्हणून भारत आपल्या आर्थिक विकासात्मक कार्यक्रमांना प्राथमिकता देऊन स्वत:ची बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील वर्तमान बदलामुळे त्यांच्या वाटेतील आव्हाने तेवढीच गंभीर आहेत. शेजारील देशांना भारताच्या बाजूने तयार करण्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागणार आहे. एकध्रुवीय, बहुध्रुवीय, बहुकेंद्रीय, अध्रुवीय जगामध्ये अनेक देश संतुलन प्रतिसंतुलनामध्ये गुंतलेले आहेत. भारत या देशामध्ये कसे संतुलन साधेल यावर भारताचे या देशांशी संबंध निर्माण होतील. भारताच्या संपूर्ण वाटचालीमध्ये चीन व पाकिस्तान या प्रतिस्पर्ध्याचे आव्हान आहे, तसेच चीनने आशियातील देशांना आर्थिक मदत देऊन आपला प्रभाव पाडण्यास सुरूवात केली आहे. त्यांच्या भारताच्या शेजारील देशांच्या संबंधावर परिणाम होत आहे. त्यामुळे भारत आपल्या शेजाऱ्यामध्ये अधिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच भारताच्या देशांतर्गत व्यवस्थापन व सक्षमतेवर भारताच्या वर्तमान परराष्ट्र धोरणाची यशस्वी वाटचाल अवलंबून आहे. भारतानेही आपला आर्थिक विकास वाढवणे महत्वाचे आहे. त्यासाठी भारताल सध्या पोषक वातावरण निर्माण झाले आहे. भारताने पूर्वकडे पहा या धोरणाचे पूर्वकडे सक्रीय ही भूमिका घेऊन शेजारील देंशाच्या विकासामध्ये भारताने सक्रीय भूमिका घेणे महत्वाचे आहे.

**चीनच्या विस्तारवादी भूमिकेस प्रतिबंधात्मक व्यूहरचना**

चीनने गेल्या काही वर्षामध्ये आपल्या आशिया खंडाविषयीच्या धोरणामध्ये बदल केलेला आहे. आशिया खंड हा आशियाई लोकांसाठी आहे. या आशियाई लोकांनी आणि देशांनी आता आशिया खंडाचे व्यवस्थापन केले पाहिजे, शी. झिनपिंग जेव्हा चीनचे राष्ट्राध्यक्ष बनले तेव्हा चीनने आक्रमक परराष्ट्र धोरणाचा स्वीकार केला आणि विस्तारवादावर भर देण्यास सुरुवात केली. तसेच चीनने जपान, फिलिपिन्स, व्हिएतनाम या देशांबरोबर सीमावाद उकरुन काढले आहेत. दक्षिण चीन समुद्र, उत्तर चीन समुद्र, आशिया प्रशांत महासागर क्षेत्रामधील अनेक बंदरांवर आणि बेटावंर चीन आपला दावा सांगायला सुरुवात केली. दक्षिण पूर्व आशियाई आणि उत्तर पूर्व आशियाई राष्ट्रांशी संबंध तणावपूर्ण बनलेले आहेत. सर्व आशियाई राष्ट्रांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली. सैन्यबळाच्या जोरावर शेजारी राष्ट्रांच्या अस्तित्वासमोर चीन वारंवार आव्हाने निर्माण करत आहे. आशियातील देशांनी अमेरिकेकडे चीनचा आक्रमकपणा थांबवण्यासाठी हस्तक्षेप करण्याची मागणी केली. अमेरिकेने २०११ साली 'पिव्हॉट टू' रशिया हे धोरण जाहीर केले. चीनच्या वाढत्या विस्तारवादाचा आणि आक्रमकपणाचा मुकाबला करण्यासाठी अमेरिका आपल्या नौदल शक्तीपैकी २० टक्के नौंदल आशिया

प्रशांत क्षेत्रामध्ये आणेल. ज्या ज्या राष्ट्रांना चीनकडून धोका आहे या राष्ट्रांना अमेरिका आर्थिक व लष्करी मदत देईल. या राष्ट्राबरोबर सामूहिक सुरक्षेततेच्या आधारावर अमेरिकेने काही करार करण्यास प्रारंभ केला. आशियाई राष्ट्रामधील वाढत्या असुरक्षिततेमुळे चीन एकटा पडायला सुरुवात झाली आणि चीनच्या विरोधामध्येही आशियाई राष्ट्रे अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एकत्र यायला सुरुवात झाली. चीनच्या विरोधात आशिया खंडात युती आकाराला येत आहे. भारत त्या युतीचा भाग बनण्याचा विचार करू शकतो. भारत चीनमधील सीमावाद, चीनचा संरक्षणावरील वाढता खर्च, चीन लष्कराची भारतीय सीमेवर होणारी घुसखोरी, चीनचे पाकिस्तानला असणारे समर्थन यासारख्या अनेक आव्हानांचे व्यवस्थापन करण्याची भारतला गरज आहे. चीनमध्ये आर्थिक आणि व्यापारी भागीदारी वाढवणे हे करत असताना आपले संरक्षण सज्जता वाढवून भारताला अमेरिकेबरोबरचे संबंध विकसित करण्यावर भर दिला आहे. भारत अमेरिका संबंध सुधारल्यामुळे चीनचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदललेला आहे. चीनच्या विस्तारवादी भूमिकेला पायबंद करण्यासाठी भारताने शेजारील राष्ट्रांशी हितसंबंध अधोरेखित करणे गरजेचे आहे. मात्र चीनही त्यातूनही असुरक्षितता दुर करण्याचे आशियातील राष्ट्रांना विश्वासात घेऊन एक नविन रचना निर्माण करुन अमेरिकेचे महत्व कमी करण्याचे चीनने ठरवले. चीनच्या मते, आमच्या लष्करी आधुनिकीकरणामुळे आशियाई राष्ट्रांनी असुरक्षित होण्याची गरज नाही कारण आम्हाला सर्व राष्ट्रांबरोबर शांततेचे संबंध प्रस्थापित करायचे आहेत असे चीनने सांगण्यास सुरुवात केली. कारण युरोपमध्ये आर्थिक मंदीचे वातावरण आहे. त्यामुळे चीनच्या व्यापाराला मर्यादा आल्या आहेत. चीनचे मोठे नुकसान झाले हे आर्थिक नुकसान त्यांना भारताबरोबर व्यापार वाढवून भरुन काढायचे आहे. मात्र त्याच बरोबर आशियावर आपली पकड मजबूत देखील करायचे आहे.[२]

**भारताच्या शेजारील देश व चीनचा हस्तक्षेप**

भारताचे परराष्ट्र धोरण अभ्यासताना शेजारी राष्ट्रांसोबतचे संबंध विचारात घेणे आवश्यक आहे. भारत हा आशिया खंडातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. त्यामुळे आपोआपच भारताच्या परराष्ट्र धोरणाला शेजारील राष्ट्रे प्रभावित करीत असतात. भारतीय उपखंडामध्ये सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे हे भारताचे मुख्य उद्दिष्टे आहे कारण शेजारील देशांशी संबधातील विकासातून भारतात अंतर्गत शांतता निर्माण होण्यास मदत होते, कारण भारताच्या सीमा या सात देशांशी लागून आहेत. या देशामध्ये असंतोष निर्माण झाला तर त्याचा सरळ परिणाम भारतावर होतो. भारताने आपल्या शेजारच्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यावर आपल्या परराष्ट्र धोरणात अधिक भर दिला आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या उद्दिष्टासाठी जगातील इतर राष्ट्राबरोबर जाणीवपूर्वक मैत्रीपूर्ण संबंधाचे धोरण भारत स्वीकारत आहे. भारताचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, संरक्षण संदर्भात शेजारील देशांशी संबंध आहेत. या विचारातून सार्क, दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्य संघटना अस्तित्वात आली. दक्षिण आशियातील देशांच्या सहकार्याच्या उद्देशाने ती संघटना अस्तित्वात आली. भारत, नेपाळ, बांग्लादेश, भूटान मालदीव, पाकिस्तान, श्रीलंका या सात देशांचा समावेश आहे. या सर्वच देशांमध्ये, विपुल नैसर्गिक साधन संपत्ती आहे. मात्र या देशामध्ये मोठया प्रमाणावर गरिबी, निरक्षरता, कुपोषण आहे हे देश ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्टीने एकमेकांना जोडले गेले आहे. पाकिस्तान व चीन वगळता भारताचे इतर शेजारील देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मात्र पाकिस्तान व चीनकडून भारतासाठी वारंवार आव्हान निर्माण करत आहे. भारतामध्ये दहशतवाद पसरविण्यासाठी भारताच्या या शेजारील देशांच्या भूमीचा वापर केला जातो. चीन हा आशिया खंडामध्ये गुतंवणुक करुन भारताच्या शेजारील देशामध्ये मोठया प्रमाणावर आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारताचा आर्थिक विकास आणि भारताची सुरक्षा या दोन्ही गोष्टी शेजारील राष्ट्रांशी निगडीत आहेत. त्यामुळे भारता शेजारील देशाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. आजवर त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचा फायदा चीनने घेतला आहे. आणि या राष्ट्रांना मोठया प्रमाणावर आर्थिक मदत देऊन चीनने भारताला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांसमोरील सर्वात मोठे आव्हान चीन या देशांचे आहे. चीनने स्वत:ला प्रत्येक क्षेत्रात सज्ज ठेवले आहे. कारण चीन आपल्या व्यापारी वस्तूसाठी या सर्व राष्ट्रांना बाजारपेठ म्हणून बघत आहे. चीनने भारताच्या सर्वच देशांमध्ये हस्तक्षेप करुन जवळपास सर्वच देशात मोठा गुतंवणूक केली असून येथील बाजारपेठ आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे भारता शेजारील देशांशी वाढता संबंध थांबवण्यासाठी चीन भारताबरोबर सीमावादासारखे प्रश्न निर्माण करत आहेत. मात्र सीमावादावरुन भारतासारख्या मोठया बाजारपेठेला दुखावणे. चीनच्या बाजारपेठेला धोकादायक ठरु शकते. म्हणून सध्याच्या काळातील युध्दही रणांगणावर नव्हेत तर आर्थिक घटकावरील आघाडीवर लढली जात आहेत. चीन ज्या ज्या ठिकाणी भारताला विरोध करता येईल त्या त्या ठिकाणी विरोध करण्याचा प्रयत्न करत आहे. दक्षिण आशियातील भारतीय प्रभूत्वाला जमेल तेथे आव्हान देण्याचा प्रयत्न चीन करत आहे. चीनने भारता शेजारील देशांशी व्यापार संरक्षण व द्विपक्षीय करार करत भारताला चारही बाजूने घेरण्याचा प्रयत्न गेल्या आठ वर्षात अधिक तीव्र केल्याचे दिसते. विकासाच्या नावाखाली चीनचा पूर्वेकडील देशामध्ये हस्तक्षेप वाढला आहे. नविन तंत्रज्ञान आणि प्रचंड भांडवल जोरावर भारतीय सीमेनजीक मुलभूत सोयीसुविधा निर्माण करत चीनने शेजारील देशांवर प्रभाव टाकण्यास सुरूवात केली. चीनच्या या हस्तक्षेपाला आवरणे सार्क संघटने समोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यासाठी दक्षिण आशियातील सर्व देशांनी एकत्र येऊन चीनच्या वाढत्या हस्तक्षेपाला आळा घालणे गरजेचे बनले आहे.

**सामरिक अस्तित्वासाठी चीन व भारताकडून चाललेले प्रयत्न**

सध्या आतंरराष्ट्रीय समुदायामध्ये सर्व जगाचे लक्ष्य हे दक्षिण चीन सागर व हिंदी महासागर या समुहाकडे आहे. भारताच्या शेजारील देशांना आपल्या कवेत घेण्याचे चीनचे प्रयत्न सुरू आहेत. चीनची ऊर्जेची वाढत गरज, महासत्ता बनण्याची महत्वाकांक्षा, अमेरिकेशी सुरु असलेल्या स्पर्धेमुळे चीनला जगातील अवकाश व महासागरावर सत्ता हवी आहे. त्यातूनच पूर्व—दक्षिण चीन समुद्रातील तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच नेपाळ, म्यानमार, श्रीलंका, बांग्लादेश, भूटान या देशांशी संबंध वाढवण्यास चीनने सुरूवात केली आहे. त्यामुळे हिंदी महासागर क्षेत्रामध्ये चीनला वर्चस्व निर्माण करता येईल. चीन हा भारताशेजारी असल्यामुळे चीनच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढत्या वर्चस्वाच्या झळ भारतालाही निश्चित बसणार आहेत.

- **हिंदी महासागराचे सामरिक महत्व**

जगामध्ये जेवढे महासागर आहेत त्यातील प्रमुख सामरिक स्थळ म्हणून हिंद महासागराचा उल्लेख केला जातो. हिंद महासागर हे ऑस्ट्रेलिया, दक्षिण—पूर्व आशिया, दक्षिण आशिया, पश्चिम आशिया, पूर्व व दक्षिण आफ्रिका राष्ट्रांच्या सामुहिक शक्तीला प्रभावित करीत आहे. जगातील तेलाच्या ६६ टक्के तेलाचे भांडार हिंद महासागरामध्ये आहेत. इतरही खनिज व नैसर्गिक संपत्ती मोठया प्रमाणात या महासागरात आहे. असंख्य लहान मोठया आकाराची बेटे ज्यांना आज सामरिकदृष्टया महत्व प्राप्त झाले आहे. उदा. दिएगो—गार्सिया, अंदमान—निकोबार, लक्षद्विप, मलाक्का व सुदान समुद्र धुनीमार्गे प्रशांत महासागरातून, सुएझ कालव्यामार्गे लाल समुद्रातून हिंदी महासागरात जाता येते. जागतिक तेलाच्या सगळया वाटा याच महासागरातून जातात. पश्चिम युरोप ७० टक्के तर जपान १०० टक्के तेलाच्या गरजेचा पुरवठा संबंधीत राष्ट्रांना याच सागरातून आयात करावा लागतो. या सागरातून दररोज अनेक कोटी रुपयांच्या मालाची ने—आण केली जाते.[३] आज हा भाग अविकसित म्हणून ओळखला जातो. किनाऱ्यावरील राष्ट्रांपैकी भारत एक राष्ट्र लष्करी, लोकसंख्या, क्षेत्रफळ, आकार, आर्थिक या सर्वच बाबतीत इतरापेक्षा मोठे म्हणून ओळखले जाते. भारत व हिंद महासागर अगदी प्राचीन काळापासून हिंद महासागराच्या सामारिक श्रेष्ठतेमुळे त्यावर आपला प्रभाव ठेवण्यासाठी अति बलाढय राष्ट्रे अत्यंत खटाटोप करताना दिसत आहेत. महासत्ता सोव्हिएत रशिया व अमेरिका आपल्या हिताच्या संवर्धनासाठी आणि परस्परविरुध्द कारवायांसाठी हिंद महासागरात सत्तेसाठी स्पर्धा वाढवली. अमेरिकेनेही हिंद महासागरास आपली शक्ती वाढवण्याचा प्रयत्न केला. रशिया व चीनच्या साम्यवादाला विरोध करण्यासाठी हिंद महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांना बरोबर घेऊन सिटो, सेंटो सारख्या लष्करी संघटना निर्माण केल्या. १९६५ अमेरिका व इंग्लड यांच्यात एक करार झाला या करारानुसार दिएगो—गार्सिया हे बेट दळणवळण केंद्र म्हणून २०१६ पर्यंत अमेरिकेला देण्याचे इंग्लडने मान्य केले. तेव्हापासून पोलरिस जातीच्या पाणबुडया हिंद महासागरात संचार करु लागल्या आहेत. अमेरिका या भागात रस घेण्याची दोन कारणे आहेत. ती म्हणजे अमेरिका भांडवलशाही राष्ट्र आहे, त्यांनी आपले भांडवल अरब राष्ट्रातील तेल उत्पादनात गुंतवले आहे. शिवाय आपल्या राष्ट्रांची तेल व पेट्रोलची गरज भागवण्यासाठी सुवेझ कालवा, मलाक्का, केप ऑफ गुड होप, ऑस्ट्रेलियाकडे जाणारे सर्व मार्ग आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यात अमेरिकेला यश आले. पाकिस्तान, सौदी अरेबिया, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम इ घनिष्ठ मित्र अमेरिकेने या क्षेत्रात मिळवले आहेत. तसेच आता हिंद महामार्गतील वर्चस्व निर्माण करण्यासाठी चीनही प्रयत्नशील आहे. हिंद महासागर व पॅसिफिक महासागर यांना जोडणारा दुवा म्हणजे दक्षिण चीन समुद्र त्यामुळे हिंद महासागर चीनसाठी महत्वाचा बनला आहे. पॅरासेल, स्प्रॅटली, सेनकुक या बेंटावर चीनने हक्क सांगितला. बंगालचा उपसागरात इंग्या बेटावर नाविक तळाची स्थापना चीनने केली. हिंदी महासागरामध्ये आज अमेरिका, चीन, पाकिस्तान यांच्या हालचालीमुळे हिंद महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांची पर्यायाने भारताची व हिंद महासागराची सुरक्षितता मोठया प्रमाणात धोक्यात आलेली आहे. म्हणून भारताच्या दृष्टीने हिंद महासागर महत्त्वाचा आहे. भारताच्या नावावरुन या समुद्राला हिंदी महासागर हे नाव पडले आहे. भारताच्या दृष्टिने हिंद महासागर महत्त्वाचा आहे. भारताला प्रचंड प्रमाणात सागरी सीमा लाभल्या आहेत. पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंद महासागर ८००० किलोमीटर समुद्र सीमा लाभलेली आहे. भारताला लाभेलेल्या समुद्रावर आक्रमणाचा धोका आहे. हिंद महासागरास परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाल्यास त्याचा प्रयत्न भारताच्या सुरक्षिततेवर परिणाम होणार आहे. सागरी बेटे, व्यापारासाठी हिंद महासागर भारतासाठी महत्वाचे आहे. आज हिंद महासागरास अमेरिका, चीन, पाकिस्तान या भारताच्या शत्रु राष्ट्रांच्या युध्द नौकांच्या हालचाली मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. भारताची राष्ट्रीय सुरक्षितता धोक्यात येईल त्याचा भारताच्या आर्थिक विकासावर परिणाम होईल म्हणून आपली राष्ट्रीय सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी आपल्या आर्थिक विकासासाठी व किनाऱ्यावरील राष्ट्रांच्या सरंक्षणासाठी भारताने हिंद महासागरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले पाहिजे. हिंद महासागर क्षेत्रातील भारताचे हितसंबंध जपण्यासाठी विविध पावले उचलली जात आहेत.

- **दक्षिण चीन समुद्र**

जगातील महासत्ता बनण्याचे स्वप्न चीन बाळगून आहे. चीनचा तेलाचा साठयाचा प्रवास सोपा व्हावा व चीनचा आर्थिक विकास दर वाढावा यासाठी चीनची पावले वेगाने पडत आहेत. दक्षिण चीन समुद्राच्या सुमारे ९० टक्के टापूवर चीनने दावा सांगितला आहे. आर्थिक व लष्करी सामर्थ्याच्या जोरावर दक्षिण चीन समुद्रावर आपला अनेक प्रकारे हक्क सांगू लागला आहे. चीने स्वत:च ठरवलेली 'नाइन डॉट लाइन' ही आपली ऐतिहासिक सागरी हद्द असल्याचे दावा करीत संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर अगदी व्हिएतनाम,

मलेशिया, ब्रुनेई, फिलिपिन्सच्या इकॉनॉमिक झोनवर चीनने मालकी सांगायला सुरुवात केली. दक्षिण चीन समुद्रातील ज्या भागात चीनने आपला हक्क सांगितला आहे. त्या ११ अब्ज बॅरेल तेलसाठा, १९० लाख कोटी घन मी. नैसर्गिक वायूसाठा असल्याचा अंदाज आहे. तसेच चीनचा ५.३ लाख अब्ज डॉलरचा मुल्याचा परदेशी व्यापार या समुद्रामार्गे हात असल्याने या भागात आपले नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न चीनने केला आहे. प्रचंड वेगाने विकसित होणाऱ्या चीनसाठी हे ऊर्जा साठे व व्यापार महत्वाचा असणार आहे. पार्टली बेट व पॅरासल बेट या दोहो मध्येच दक्षिण चीन समुद्र आहे. सर्व जहाजे व युध्द नौका याच दोन बेटामधून जातात. या दोन बेटांच्या मालकी हक्कावरून चीन व दक्षिण पूर्व आशियामध्ये संघर्ष सुरु आहे. या संघर्षामध्ये चीन, व्हिएतनाम, फिलिपिन्स, मलेशिया, भारत तसेच तैवान, ब्रुनेई या राष्ट्रांचे आर्थिक व संरक्षण हितसंबंध गुतलेले आहेत. व्हिएतनाम व चीन यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र आहे. तर फिलिपिन्सने आंतरराष्ट्रीय लवादाकडे या विरोधात धाव घेतला. आंतरराष्ट्रीय लवादाने १२ जुलै २०१६ ला चीनचा दक्षिण चीन समुद्रावरील दावा अमान्य केला आहे. मात्र चीन हे मानायला तयार नाही. चीनच्या मते, दक्षिण चीन समुद्र हा आमच्या अधिकार क्षेत्रामध्ये येतो. तेथे आम्हाला तेल उत्खननाचे व मासेमारीचे अधिकार आहेत. पण आंतरराष्ट्रीय समुद्र कायद्यानुसार प्रत्येक देशाचे समुद्रामधील विशेष आर्थिक क्षेत्र हे २०० नॉटिकल मैल इतके असते. त्यामुळे आमच्या विशेष आर्थिक क्षेत्रावर चीन दावा सांगत आहे. असे या देशांचे म्हणणे आहे. त्यामुळे दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रे व चीन यांच्यातील संघर्ष वाढला आहे. भारतासाठी ही दक्षिण चीन समुह महत्वाचा आहे.[४] आशिया प्रशांत क्षेत्रामधील एकुण व्यापारापैकी ५५ टक्के व्यापार हा दक्षिण चीन समुद्रातून होता. तसेच दक्षिण चीन समुद्र हा बंगालचा उपसागराला लागून आहे. मोठया प्रमाणावर व्यापार चालत असल्यामुळे भारताला या समुद्रामध्ये अधिक रस आहे. भविष्यात भारताने या समुद्रामध्ये अधिक लक्ष दिल्यास भारताचा व्यापार वाढणार आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये भारताला 'फ्रीडम ऑफ नेव्हिगेशन' (समुद्रां स्वातंत्र्य) हवे आहे. याबाबतची मागणी भारत सातत्याने करत आहे. दक्षिण चीन समुद्रामध्ये असलेल्या व्हिएतनामने अलीकडेच भारताला तेल उत्पादनाचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे चीन व व्हिएतनाम संबंध आणखी ताणले आहेत. भारताने सागरी क्षेत्रात येऊ नये असा इशारा चीनने दिला आहे. दोन महिन्यापूर्वी भारतीय पंतप्रधान प्रणव मुखर्जी व्हिएतनाम दौऱ्यावर असताना दक्षिण चीन समुद्राविषयी भूमिका स्पष्ट केली. चीन समुद्राचा वाद हा १९८२ च्या संयुक्त राष्ट्र संघाच्या सागरी सीमारेषा, तंटे सोडवण्याबाबत करारानुसार सोडवला गेला पाहिजे. तसेच या प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रत्येकाला सागरी वाहतुकीचे स्वातंत्र्य असले पाहिजे असे स्पष्ट केले. तसा प्रस्तावही भारताने व्हिएतनाम सोबत तयार केला आहे. भारताच्या या भूमिकेला चीनचा आक्षेप आहे. व्हिएतनाम, जपान, भारत या तीन राष्ट्रांच्या एक संघ तयार होत आहे आणि अमेरिका व ऑस्ट्रेलिया हे दोन देशही यामध्ये लवकर सामील होणार आहेत. दक्षिण चीन समुद्रावर चीनचे प्रभूत्व व प्रभाव वाढू नये अशी या सगळयाची मागणी आहे. चीनचा प्रभाव वाढल्यास या सर्व राष्ट्रांना त्याचा त्रास होणार आहे. कारण ओपेक आसियान, ईस्ट एशिया समिट या तीनही संघटना दक्षिण चीन समुद्राशी निगडीत आहेत.

**भारताची पूर्वेकडे सक्रीय भूमिका**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर आपल्या शपथविधी सोहळयासाठी दक्षिण आशियाई देशांचा प्रमुखांना आमंत्रित करुन भारताची सध्याची परराष्ट्र धोरणाची भूमिका स्पष्ट केली. शेजारील देशांशी संबंधाना आलेले आपला अग्रक्रम त्याद्वारे दाखवून दिला. जागतिक पातळीवर भारताला आपले अस्तित्व निर्माण करायचे असेल तर शेजारी देशात स्थैर्य असणे गरजेचे आहे. आशियाई प्रदेशात काही विधायक मोर्चे बांधणी करण्याच्या दृष्टीने अलीकडच्या काळात भारत सरकारने पूर्वेकडील देशांच्या बाबतीत महत्वाचे पावले उचलण्यास सुरुवात केली. नरसिंहराव यांचे लुक ईस्ट धोरण पूर्वेकडील मोर्चे बांधणीस अधिक महत्व देणारे ठरले. गेल्या काही दशकात भारताने आशियाई राष्ट्रांशी आपले संबंध दृढ करण्यास सुरुवात केली व लुक ईस्ट धोरणाचे २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी व विदेशमंत्री सुषमा स्वराज यांच्या कारकीर्दीत 'ॲक्ट ईस्ट' धोरणात रुपांतर झाले[५] भारताने सार्क संघटनेतील सदस्य देश पाकिस्तान, नेपाळ, भूटान, बांग्लादेश, मालदीव, श्रीलंका, अफगाणिस्तान तसेच आसियानचे सदस्य देश, इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर, फिलीपाईन्स, कंबोडिया, लाओस, थायलंड, ब्रुनेई, म्यानमार, व्हिएतनाम सह भारताच्या इतर पूर्वकडील देशांशी भारताने संबंध सुधारण्यावर भर देण्यास सुरुवात केली. उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, ईस्टतिमोर, न्युझीलॅण्ड, चीन, जपान, हॉगकॉग, जावा, तैवान, पियोजियांग, फिजी सारख्या देशांशी भारताने संबंध सुधारण्यावर भर दिला आहे. या प्रदेशात भारताने पर्यावरण, ऊर्जा नैसर्गिक वायू, शिक्षण, नैसर्गिक आपत्ती निवारण, रस्ते जोडणी, तेल इ. क्षेत्रामध्ये आपले संबंध विकसीत करण्यावर भर दिला.

त्यामध्ये रस्ते बांधणी, पुल बांधणी, रेल्वे रुळांची बांधणी, इंडस्ट्रीयल पार्कची उभारणी, चीन भारताला मदत करत आहे. सध्या भारतासमोर ऊर्जा संसाधन व दहशतवादही दोन मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारता शेजारील देशांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे गरजेचे बनले आहे. पूर्वेकडील देश भारतासाठी आर्थिक व व्यापारी दृष्टीकोनातूनच नाही तर संरक्षणाच्या दृष्टीकोनातूनही महत्वाचा आहे. आगामी काळात भारत पूर्व आशियातील देशांबरोबर पर्यावरण, ऊर्जा, वित्त या क्षेत्रामध्ये आपले संबंध विकसित करण्यावर भर देत आहे. आर्थिक क्षेत्रात विकासाच्या कार्यातील आशियाचे महत्व भारताने ओळखले. भारताने घेतलेल्या भूमिकेमुळे पूर्वेकडील देशामंध्ये परस्पर विश्वास व आदराची भावना निर्माण होण्यास सुरुवात झाली.

**भारताच्या पूर्व आशियाई धोरणाची फलश्रुती**

१९९० च्या दशकामध्ये दक्षिणपुर्व आशियाने प्रगती घडवून आणली आणि एशियन टायगर्स म्हणून पुर्व आशियातील देश पुढे आले. शीतयूध्द संपल्यानंतर भारताने आर्थिक उदारीकरणाची दिशा स्वीकारली होती. आर्थिक व व्यूहरचनात्मक संबंधाच्या दृष्टीने शेजारी देशांकडे पहायला भारताने सुरुवात केली हे धोरण म्हणजे भारताचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याची आणि जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला स्थान मिळाल्याची खुण होती. नरसिंहराव यांचे पुर्वेकडे पहा धोरण पुर्वेकडील मोर्चेबांधणीस अधिक महत्व देणारे ठरले. गेल्या काही दशकात भारताने पुर्व आशियाई राष्ट्रांशी आपले संबंध दृढ करण्यास सुरुवात केली व 'लुक ईस्ट' धोरणात रुपांतर झाले. व आशियाई महासत्ता व तिसऱ्या जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाऊ लागले. आशियाई राष्ट्रांचे हितसंबंध हे भारत केंद्रित आहेत. भारतानेही शेजारील देशांशी प्रत्यक्ष संबंध सुधारण्यावर भर द्याला सुरुवात केली. पुर्व आशियाई देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत आहे. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न भारताने करायला सुरुवात केली. भारतासमोरील सध्या सर्वात मोठी आव्हाने म्हणजे दहशतवाद व ऊर्जा संसाधनाचा अपुरा पुरवठा भारताच्या पुर्वेकडील देशामध्ये विपुलप्रमाणात ऊर्जा संसाधन उपलब्ध आहे. त्याचा भारताच्या विकासाला फायदा होणार आहे. त्यामुळे भारताने पुर्वेकडील देशांशी त्या दृष्टिकोनातून संबंध सुधारण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. या प्रयत्नांना भारताला काही प्रमाणात यश येत आहेत. तर काही नकारात्मक गोष्टीही घडत आहेत.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने सत्तापदाची सुत्रे घेतल्यानंतर परराष्ट्र धोरणावर सर्वाधिक लक्ष केंद्रीत केले आहे. आज भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टये बदलताना दिसत आहेत. आर्थिक हितसंबंध साधण्याचे साधन म्हणजे पराराष्ट्र धोरण हा दृष्टिकोन विकसित झालेला आज पहायला मिळत आहे, ही भारतीय परराष्ट्र धोरणाची फलश्रुती म्हणता येईल. नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांची आखणी ही अतिशय सुत्रबध्द पध्दतीने करण्यात आल्याचे दिसून येते. त्यातील पहिला टप्पा म्हणजे आशियातील शेजारील शेजारील राष्ट्रांशी संबंध घनिष्ठ करण्याचे त्यामागे दोन उद्दिष्टये होती. एक म्हणजे शेजारी राष्ट्रांचा विश्वास संपादन करणे व दुसरे उद्दिष्ट म्हणजे गेल्या दहा वर्षामध्ये वाढत चाललेला चीनचा दक्षिण आशियातील हस्तक्षेप कमी करणे. त्यानुसार भुटान, नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका दौऱ्यामधून काही महत्वपुर्ण गोष्टी घडलेल्या आहेत. आज शेजारील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आलेल्या आहेत. भारताने त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. त्यानुसार नेपाळ व भुटानमध्ये जलविद्यूत निर्मितीसाठी मोठयाप्रमाणात मदत करण्यात आली. त्यामुळे भारताची ही ऊर्जेची गरज त्यामाध्यमातून पुर्ण होणार आहे.

त्याचप्रमाणे भारत–बांग्लादेश यांच्यामध्ये १९७४ पासून प्रलंबित असणारा भू–सीमारेषा करार पुर्णत्वास नेण्यास काही ठोस पावले उचलली गेली. दोन्ही देशातील भुखंडाच्या अदलाबदलीचा अतिशय कठीण आणि गुंतागुतीचा प्रश्न सोडवण्यावर भर दिला गेला. त्यामुळे बांग्लादेश सोबतचे संबंध सुधारण्यास फार मोठी मदत झाली. दक्षिण आशियातील नेपाळ हा भारताचा तितकाच महत्वाचा शेजारी देश आहे. नेपाळमध्ये एप्रिल २०१५ मध्ये झालेल्या भीषण भुकंपानंतर सर्वप्रथम भारत धावून गेला. अवघ्या पाच तासांत भारतीय लष्कराची विमाने काठमांडूमध्ये बचाव कार्यासाठी दाखल झाली.भारतीय लष्कराने तेथील बचाव कार्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. नेपाळमधील या मोहिमेला भारताने 'ऑपरेशन मैत्री' असे नाव दिले. तसेच भारताने नेपाळला 'ॲक्ट ईस्ट' धोरणाच्या माध्यमातून भारतने तेथे जलविद्यूत प्रकल्प निर्मिती करार, नेपाळमध्ये भारत जास्ती जास्त गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करत आहे. कारण जर नेपाळकडे भारताचे दुर्लक्ष झाले तर नेपाळ सहजच चीनच्या प्रभावाखाली जाऊ शकतो. तसे काही प्रमाणात नेपाळ चीनच्या प्रभावाखाली गेला आहे. भारताने केवळ व्यापारी, आर्थिक दृष्टिकोनातून नाही तर संरक्षणाच्या दृष्टिनेही दक्षिणपुर्व आशियाई देशांकडे पाहण्यास सुरुवात केली. या अंतर्गत भारताचे राष्ट्रपती व्हिएतनाम भेटीवर जाऊन भारताने व्हिएतनाम संरक्षण सामुग्रीच्या खरेदीसाठी व्हिएतनामला १०० दशलक्ष डॉलर्सची आर्थिक मदत जाहीर केली. त्याचप्रमाणे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी चार आशियाई देशांचा दौरा केला. त्याचप्रमाणे भारताच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज या देखील आशियातील देशांच्या दौऱ्यावर जाऊन शेजारील देशांशी संबंध वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.[६]

आसियान–भारत बैठक ईस्ट एशिया समेट यासारखा बहूराष्ट्रीय परिषदांच्या बैठका निमित्ताने भारत दक्षिण–पुर्व आशियाई देशांशी व्यापारसंबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे. आजच्या घडीला भारत व पुर्व आशियाई यांच्यातील व्यापार हा ७६ अब्ज डॉलर्स वरुन तो १०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. तसेच भारत, बांग्लादेश, म्यानमार, कंबोडिया, लाओस यांना जोडणारा जवळपास अडीच हजार किलो मीटरचा मोठा रस्ता जाणार आहेत. भारत–आसियान मुक्तव्यापार क्षेत्र निर्माण होण्यास मदत होईल ही भारतासाठी मोठी उपलब्धी असेल. तसेच जपानशी भारताने सहकार्य वाढवून तेथील तंत्रज्ञानाचा उपयोग भारतातील स्मार्ट सिटर विकासीत करण्यासाठी होतो आहे. जपानसोबत महत्वपुर्ण अणुकरार, बुलेट ट्रेनसाठी गुंतवणूक करण्यास जपानने दर्शविलेली सहमती, संरक्षण क्षेत्रातील अत्यंत संवेदनशील तंत्रज्ञान भारताला हस्तांतरंण करण्याबाबात जपानने दर्शविलेली तयारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेमध्ये सुरक्षा परिषदेच्या विस्ताराबाबत आणि कायम सदस्याबाबत भारताने मांडलेली भुमिका या काही महत्वपुर्ण घडामोडीमुळे विभागीय व आंतरराष्टीय पातळीवर भारताचा प्रभाव वाढत चालला आहे.

जगभरातील देशांमधील गुंतवणूकदार, उदयोजक भारताकडे आशेने पाहत आहेत. भारत हा वेगाने बदलत असून तो इनव्हेस्टर फ्रेंडली बनत आहे. जगभरातील देश भारतामध्ये गुंतवणुक करण्यास पुढे येत आहेत. तसेच भारतातील इतर देशांमध्ये असेलेले भारतीय निवासी लोक यांच्याशी भारत सरकारने वेगवेगळया देशांशी दौरे करताना मोदींनी भारतातील लोकांशी व उदयोजकांशी संपर्क वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे परदेशात राहणारे भारतीय उदयोजकांनीही भारतामध्ये आर्थिक गुंतवणूक करण्यासाठी पुढे येत आहेत. भारताने या बदल्या भारताची प्रतिमा जागतिक पटलांवर उंचावण्यामध्ये या सरकारच्या प्रयत्नांना यश येत आहे. भारताने पुर्व आशियातील छोटया मोठया देशांशी सारख्याच प्रमाणात मैत्रीपुर्ण संबंध वाढवून पुर्व आशियाई देशांनमध्ये आपला प्रभाव वाढवण्यात यश मिळवले आहे. पुर्व आशियाई देशांशी संबंध निर्माण करताना जसे सकारात्मक पावले उचलण्यात येत आहेत त्याचबरोबर काही नकारात्मक गोष्टीनांही भारताला आशियातील देशांशी संबंध ठेवताना सामोरे जावे लागत आहे. भारताला विकासाच्या प्रक्रियेत पुढे येण्यापासून शेजारील दोन देश पाकिस्तान व चीन ही दोन्ही देश भारताला वारंवार आव्हाने निर्माण करत आहेत. चीन पाकिस्तानच्या माध्यमातून भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे. चीन पाकिस्तानाला मदत करत आहे. पाकिस्तानला भारताविरोधी मदत करणे. भारताच्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षेच्या आड येणे, भारताच्या शेजाऱ्यांच्यामध्ये लष्करी व व्यापारी केंद्रे निर्माण करणे, तसेच भारताच्या पाक व्याप्त काश्मीर मध्ये वीजनिर्मिती प्रकल्प उभारुन भारताला अंतर्गत कारभारावर नियत्रंण ठेवण्याचा प्रयत्न चीनकडून होताना दिसत आहे. भारत—पाकिस्तान आर्थिक महामार्ग पाकव्याप्त काश्मीरमधून जातो. त्याचा भारताच्या संरक्षणक्षेत्रावर परिणाम होऊ शकतो. चीनच्या सैनिक या भागातील कामामध्ये प्रत्यक्ष सहभागी असल्याने भारताच्या संरक्षणावरील धोरणाचा, रणनितीची सहज माहिती चीनला उपलब्ध होऊ शकते. हे भारताच्या संरक्षणासाठी धोक्याचा इशारा आहे. त्यामुळे भारताने या मार्गाला विरोध करण्यामध्ये सातत्य ठेवले पाहिजे. चीन—पाकिस्तान महामार्ग, 'वनबेल्ट ॲन्ड वन रोड', तसेच हिंदी व प्रशांत महासागराद्वारे व्यापाराबाबत 'मेरिटाइम सिल्क रोड'ची संकल्पना यामुळे भारताच्या हे भारताच्या आर्थिक सार्वभौमत्वाला धोका निर्माण होऊ शकतो. भारताने या प्रकल्पातील सहभागात नकार दिला आहे. तरी येत्या काळात भारताने या प्रकल्पाबाबत आपली या क्षेत्रातील भूमिका घेणे महत्वाचे आहे. कारण प्रकल्पातून प्रत्येक देशांचा व्यापारी व आर्थिक विकास करणे हे या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे चीन सांगत असला तरी चीनच्या विस्तारवादी भूमिका ही या प्रदेशांमध्ये आपला प्रभाव व ताकत निर्माण करुन या प्रदेशात आपली सत्ता निर्माण करण्याचा चीनचा खरा हेतू आहे. तसेच भारताला आण्विक पुरवठादार (एन. एस.जी) गटात समावेशाबाबत चीनचा विरोध, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताच्या सदस्यत्वाला विरोध, पाकमधील ग्वादार बंदर विकसित करणे, मसूद अझर सारख्या दहशतवादी संघटनेला पाठीशी घालण्यापर्यंत चीन पाकिस्तानला भारता विरोधी मदत करत आहे. भारताला एन.एस.जी बाहेर ठेवून पाकला खुष ठेवणे आणि ग्वादारमधील प्रवेशाचे अनिर्बंध अधिकार उपयोगात आणणे ही चीनची खेळी आहे. तसेच नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका या अन्य शेजारील देशांतही हितसंबंध निर्माण करीत भारताविरोधी कारस्थाने आखण्याचा प्रयत्न चीन करत आहे. चीनचे हे डावपेच ओळखून भारताने ही वेळोवेळी पावले टाकली आहेत. त्यामुळेच नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका यादेशात चीनला हवे तसे यश मिळालेले नाही. चीनला आशियात स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी अमेरिकाही भारताला बळ देत आहे. म्हणूनच एन.एस. जी व संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व भारताला मिळू न देण्याचा आटापिटा चीन करीत आहे. पाकिस्तानची पाठराखण करीत भारताला अडचणीत आणण्याचा सर्व प्रयत्न तो करतो आहे. त्याचप्रमाणे सीमारेषेचा प्रश्न ही धगधगत ठेवला आहे. अरुणाचल प्रदेशातील नावांच्या प्रमाणिकरण करण्याच्या चीनचा खटाटोप सुरु आहे. भारताला अडचणीत आणण्याचे डावपेच नवीन नमले तरी त्यामधील आक्रमकता वाढते आहे. ते लक्षात घेऊन भारताला सजग राहणे गरजेचे आहे. त्याबाबत वेळोवेळी ठोस पावले उचलून योग्य ती भूमिका घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे भारत आशियाई देशांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्याचे पावले उचलत आहे. या देशांशी आर्थिक सहकार्य, व्यापारीसंबंध वाढविणे हे त्यामागचे उद्दिष्ट आहे. तसेच पुर्वेकडच्या देशांशी संबंध वाढविताना चीनच्या आर्थिक, लष्करी वर्चस्वाला शह देणे हा भारताचा दृष्टिकोन आहे. त्याचबरोबर भारताला आपला व्यापार वाढवायचा आहे. त्यासाठी पुर्व आशियाई देशांची बाजारपेठ हवी आहे. तेथे गुंतवणूक करुन आशियाई देशांना आकर्षित करायचे आहे. त्या दृष्टिकोनातून भारताचे प्रयत्न सुरु आहेत

**संदर्भ सूची**

१. बेलोकार राजेंद्र, (२०१४), 'भारत व पाकिस्तान परराष्ट्र संबंधातील स्थित्यंतराचे चिकित्सक अध्ययन, १९९१ ते २००१', अप्रकाशित शोधप्रबंध, अमरावती. पृ. क्र. १७५
२. देवळाणकर शैलेंद्र, (२०१५), 'भारत आणि जग', सकाळ प्रकाशन, पुणे. पृ. क्र.५३
३. येचाळे नरसिंग दगडू, (२०१५), शीजयुध्दोत्तर, भारताचे परराष्ट्र धोरण एक चिकित्सक अभ्यास', अप्रकाशित शोध प्रबंध, लातूर, पृ. क्र. १६२—१६३
४. वृत्त विश्लेषण, (ऑक्टोबर २०१६), बुलेटन ऑफ युनिक ॲकडमी पृ. क्र. १६—१७
५. राजामोहन सी., (अनुवाद सावकार इंद्रायणी), (२०१६), 'मोदीज वर्ल्ड', 'विस्तारमान भारताच्या परिणामाची व्याप्ती' सकाळ प्रकाशन. पृ. क्र. १५३—१५४.
६. गायकवाड नागेश, (२०१४), 'भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध', निकीता प्रकाशन, लातूर. पृ. क्र. ९७